रे.मु.नं. २२७/२०१४
**निशाणी ७४ खाली**

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

नाव – गोविंद बापु गांगर्डे

वय– ७० वर्षे धंदा – शेती

पत्ता– मांदळी, ता. कर्जत, जि. अहमदनगर.

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. आर. फडणीस यांच्यातर्फे सा.क्र. ०२ यांच्या शपथेवर उलटतपास सुरु-**

मला एकुण चार मामा नामे नाना, हरिभाऊ, दादा व काशीनाथ आहेत. माझ्या आईचे नाव पारुबाई बापु गांगर्डे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुराबाई व चिमाबाई या माझ्या आईच्या बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भिवा महादु वाघ यांना चार मुले व तीन मुली अशी अपत्ये होती.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मामामध्ये जे वाटप झाले ते कधी झाले, कोठे झाले, कसे झाले ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे वाटप झाले ते लेखी झाले किंवा तोंडी झाले. साक्षीदार सांगतो की, वाटप लेखी झाले. लेखी वाटप किती तारखेला झाले हे मी सांगु शकत नाही. लेखी वाटपाला मी साक्षीदार नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मला लेखी वाटपाची माहिती ऐकीव आहे. भिवा महादु वाघ यांच्या आपत्यामध्ये व त्यांच्यामध्ये सात हिस्से झालेले नाहीत. साक्षीदार सांगतो चार हिस्से झालेत. हे म्हणणे खरे आहे की, मांदळी ता. कर्जत येथील जी जमीन आहे त्यामध्ये माझी आई व माझ्या दोन मावश्यांना हिस्सा देण्यात आला नाही. वाटप पुर्ण क्षेत्रामध्ये झालेले आहे.

**प्रश्नः–** वाटप किती क्षेत्राचे व कोणत्या गटाचे झाले हे तुम्हाला सांगता येणार नाही?

**उत्तरः–** वाटप संपुर्ण क्षेत्राचे झाले.

वादी तर्फ विधिज्ञ श्री. बी. ए. नागवडे यांनी नमुद केले की, साक्षीदारने मांदळीच्या संपुर्ण गटाचे वाटप झालेले आहे ते उत्तर घेण्यात यावे. सदर साक्षीदाराला पाचवेळा प्रश्न पुन्हा विचारला. सदर साक्षीदाराने चारवेळी मांदळीच्या गटाचे वाटप झाल्याचे सांगितले. पाचव्या वेळी साक्षीदार संपुर्ण क्षेत्राचे वाटप झाले आहे असे सांगितले त्यामुळे उत्तर घेण्यात आले आहे. त्यामुळे वादीतर्फे विधिज्ञ यांनी सुचविण्यात आलेले हरकत उत्तर घेणे उचित होणार नाही.

३. मला मांदळीचा गट नं २५८ माहित नाही. मला मांदळीचा गट नं २६९ माहिती आहे. तो मामाच्या सगळयांच्या नावाने लागलेला आहे. गट नं २६९ चे क्षेत्र मला सांगता येणार नाही. मला कोणाच्या नावे गट नं २६९ मध्ये किती क्षेत्र् आहे ते सांगता येणार नाही. माझा एकच मामा हयात आहे. जे मामा मयत झाले आहे त्या मामाच्या मुलांच्या नावावर गट नं २६९ चे क्षेत्र वारसाने आलेले आहे. वारसाने गट नं २६९ चे क्षेत्र कोणाच्या नावावर किती आले हे मला सांगता येणार नाही. मला मांदळीचा गट नं २५० माहित नाही. मला मांदळीचा गट नं ३१८ माहित नाही. मला मांदळीचा गट नं २६६ माहित नाही. मला मांदळीचा गट नं २८६ माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मांदळीच्या गटाबददल काहीही माहिती नाही. त्यामध्ये वाटप कधी झाले काय झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादी हरीभाउ यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

४. मला लिहिता वाचता येते. माझे शिक्षण पाचवी पर्यत झाले आहे. ज्यामिळकतीसाठी साक्ष देण्यास मी कोर्टात आलेलो आहे त्या मिळकतीचे ७/१२ मी वाचलेले आहे. त्याचा गट नं ६२ असा आहे. मी सदर मिळकतीचा उतारा एकवर्षापुर्वी पाहिला आहे. त्या उता–यावर फेरफार क्र. ११२७ असा आहे.

रे.मु.नं. २२७/२०१४
निशाणी ७४ खाली

५. मी काशीनाथ वाघ यांना ओळखतो. त्यांच्या पत्नीचे नाव गीताबाई आहे. त्या चार–पाच वर्षापुर्वी वारल्या.

६. हे म्हणणे खरे नाही की, मांदळीचा प्रापर्टी मध्ये अजुन वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रापर्टी मध्ये वाटप देवु नये म्हणुन हरीभाउ यानी फक्त श्रीगोंदाच्या प्रॉपटीचे वाटप मागितले आहे.

७. मी मोहनला ओळखतो. मोहन माझ्या नाना मामाचा मुलगा आहे. तो हयात नाही. मोहनला मुल बाळ नाही. मोहनच्या मंडळीचे नाव कमल असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोहन मयत झाल्यानंतर मोहनच्या पत्नीच्या नावावरती जी वारसाने मिळकत आली ती मी विकत घेतलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती सामाईकात होती. हे म्हणणे खरे आहे की, कमलकडुन विकत घेतलेली मिळकत मी हरीभाऊला विकली. हे म्हणणे खरे नाही की, कमलकडुन जमिन विकत घेण्याचा व हरिभाऊला विकण्याचा व्यवहार हा हरिभाऊच्या संमतीने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हरिभाऊच्या सांगण्याने खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**सरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.08.06 14:54:01 +0500
**( आर. बी. खवले )**

दि. ०६.०८.२०२५

२रे सह दि.न्या.क. स्तर,श्रीगोंदा,
जि.अहमदनगर